**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक ०८-२०२२ दिनांक ०६/०१/२०२२

## बेकायदेशीर सावकारी करणा-या व्यक्तीविरुध्द तक्रार देण्यास मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडुन नागरिकांना आवाहन.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अनेक व्यक्ती बेकायदेशीररित्या सावकारी करुन मजुर, कामगार, सामान्य नागरिक यांना वेठीस धरुन दिलेल्या मुळ रकमेपेक्षा जास्तीत- जास्त प्रमाणात व्याज वसुल करत असल्याचे व सामान्य लोकांची छळवणुक करत असल्याचे निदर्शनास आले आहे. सामान्य नागरिक अशा सावकारांच्या भीतीपोटी पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास जात नाहीत.

तरी याव्दारे सर्व नागरिकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, अशा प्रकारे बेकायदेशीर सावकारी व्यवसाय करत असणा-या व्यक्तीविरुध्दची माहिती किंवा तक्रार जवळच्या पोलीस स्टेशनला देण्यात यावी.

--------ooo--------